International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

Original Article

प्राचीन भारतातील दुसरे नागरिकरणाचे परिवर्तन

प्रा. डॉ. अभय पाटील.

इतिहास विभाग,

स. गा. म. कॉलेज. कराड

Manuscript ID:
IJAAR-130610
ISSN: 2347-7075
Impact Factor – 8.141

Volume - 13
Issue - 6
July – August 2026
Pp. 77 - 81

Submitted: 20 July 2026
Revised: 29 July 2026
Accepted: 1 August 2026
Published: 10 August 2026

Corresponding Author:
प्रा. डॉ. अभय पाटील.

Quick Response Code:

Website: https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.21900529

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.21900529

प्रस्तावना:

प्राचीन भारतातील नगरांचा उदय आणि विकास ही महत्वपूर्ण व विशेष घटना आहे.मानवी इतिहासात शहरांनी सामाजिक परिवर्तनात महत्वाचा वाटा उचललेला आहे. ही शहरीकरणाची प्रक्रिया हजारो वर्षाच्या परिवर्तनातून झालेली आहे. प्राचीन काळापासून शहरीकरणाची प्रक्रिया चालू आहे.भारतातील सर्वात प्राचीन व पहिले नागरीकरण म्हणून ओळखली जाणारी हडप्पा अथवा सिंधू संस्कृती होय.या पहिल्या नागरीकरणाचे केंद्र सिंधूच्या खोऱ्यात होते.या संस्कृतीचा कालखंड हा इ. स. पूर्व २५०० ते इ.स.पूर्व १७०० आहे. सिंधूनदी व तिच्या उपनदयाच्या खोऱ्यात हे पहिले नागरीकरण घडून आले. तर दुसरे नागरीकरण हे गंगा नदीच्या खोऱ्यात घडून आले. यांची सुरूवात इ.स.पूर्व ६व्या शतकात झाली. या नागरीकरणाचा विस्तार दक्षिणेत चौथ्या व तिसऱ्या शतकात होऊ लागला. लोह धातूचा वापर, पर्यावरणात झालेली सुधारणा, या काळात नव्या व्यवसायांची झालेली सुरूवात, दळणवळणाच्या सोई त्यामुळे भरभराटीस आलेला व्यापार, जनपदे व महाजनपदाचा झालेला उदय नगरराज्यात वैश्यांनी केलेली वस्ती व व्यापार यामुळे औघोगिक केंद्रांचा झालेला उदय तसेच या काळात धर्मसुधारणा आंदोलने व नव्या बौध्द — जैन धर्माचा प्रभाव तसेच नवीन शैक्षणिक केंद्राचा उदय व विकास काळाच्या ओघात वाढलेली लोकसंख्या आणि वसाहती यामुळे दुसरे नागरीकरण प्राचीन भारताच्या बाबतीत महत्वपूर्ण परिवर्तन करणारे ठरले.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)

This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0), *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

How to cite this article:

प्रा. डॉ. अभय पाटील. (2026). प्राचीन भारतातील दुसरे नागरिकरणाचे परिवर्तन. International Journal of Advance and Applied Research, 13(6), 77 – 81. https://doi.org/10.5281/zenodo.21900529

Creative Commons

OPEN ACCESS

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

मौर्यकाळात गंगानदी परिसराची आर्थीक स्थितीची विशेषता म्हणजे लोकांचे झालेले नागरीकरण होय. 'गॉर्डन चाईल्ड' यांनी नागरीकरणाची विशेषता ही विशाल इमारती व दाट लोकवस्ती मानलेली आहे; या नगरामध्ये नवीन व्यवसाय सुरू झाले. असे उल्लेख जातक कथा मध्ये आढळतात. अन्नधान्य उत्पादन न करणारे म्हणजेच शासन करणारे, शिल्पकाम करणारे, दुसऱ्याची सेवा करणारे, धातूच्या वस्तू बनविणारे, धोबी, विणकाम करणारे, शिवणकाम करणारे, न्हावी, मातीची भांडी तयार करणारे, हस्तिदंत वस्तू बनविणारे, लाकडी काम करणारे, चामडी काम करणारे व अन्नधान्य उत्पादन करणारे.व नगरवाशियांचे पालन पोषण करण्यासाठी कर गोळा करणारे, कलाकार व वैज्ञानिक मंडळी नगरात रहात होती.'गॉर्डन चाईल्ड यांनी शेतीतील अन्नधान्य बाबीवरती मिळणाऱ्या करावर अधिक भर दिला आहे'.

भारतामध्ये नगराचा विकास:

भारतामध्ये नगरांच्या विकासाने आर्थीक सुबत्तेलाच नाही तर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजनैतिक प्रक्रियेला बदलेले आहे.कृषक समाज व गाई म्हैशी यांच्या पालणामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळाली.शेती बरोबरच इतर व्यवसायामध्ये कमी अधिक प्रमाणात अंतर्गत व्यवसाय—व्यापार सुरू झाला. परिणामी नागरी अर्थव्यवस्थेने दुसऱ्या नागरीकरणाची पृष्ठभूमी तयार केली.

दुसऱ्या नागरीकरणाचा काळ:

दुसरे नागरीकरण हे गंगा नदीच्या खोऱ्यात घडून आले. यांची सुरूवात इ.स.पूर्व ६व्या शतकात झाली.(इ.स.पूर्व ६०० ते इ.स. पूर्व ३२१) या नागरीकरणाचा विस्तार दक्षिणेत चौथ्या व तिसऱ्या शतकात होऊ लागला. लोह धातूचा वापर, पर्यावरणात झालेली सुधारणा, या काळात नव्या व्यवसायांची झालेली सुरूवात, दळणवळणाच्या सोई त्यामुळे भरभराटीस आलेला व्यापार, जनपदे व महाजनपदाचा झालेला उदय नगरराज्यात वैश्यांनी केलेली वस्ती व व्यापार यामुळे औघोगिक केंद्रांचा झालेला उदय तसेच या काळात धर्मसुधारणा आंदोलने व नव्या बौध्द — जैन धर्माचा प्रभाव तसेच नवीन शैक्षणिक केंद्राचा उदय व विकास काळाच्या ओघात वाढलेली लोकसंख्या आणि वसाहती यामुळे दुसरे नागरीकरण प्राचीन भारताच्या बाबतीत महत्वपूर्ण परिवर्तन करणारे ठरले. वैदिक, बौध्द, जैन व ब्राम्हण साहित्यात या विषयीचे उल्लेख सापडतात. ब्राम्ही, पाली, संस्कृत भाषेतील ग्रंथात मोठया व संपन्न नगराचा उल्लेख मिळतात. बनारस—काशी, राजगृह, अयोध्या, कौशांबी, चंपा, मल्ल, वैशाली, श्रावस्ती, उज्जैन, भारहुत, सांची, अमरावती, मथुरा, कपिलवस्तू, कुशीनगर, तक्षशिला इ. नगरे बहरलेली होती. याविषयीचे उल्लेख वाड:मयात मिळतात. ही नगरे अंत्यत नियोजितपणे वसविली गेली होती.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

दुसऱ्या नागरीकरणाचे स्वरूप:

दुसऱ्या नागरीकरणाची प्रक्रिया ही हजारो वर्षाच्या परिवर्तनातून झालेली पहावयास मिळते. आजची नगरे पहावयास मिळतात ती हजारो वर्षापासून चालू असलेल्या नागरीकरणापेक्षा आधुनिक स्वरूपात दिसून येतात.नागरीकरणाची ही प्रक्रिया प्राचीन काळापासून चालू आहे.हे दुसरे नागरीकरण गंगानदी व तिच्या उपनदयाच्या खोऱ्यात सुरू झाल्याने भारतात पहिले जुने शहर पाटणा वसले.जैन व बौध्द धर्माच्या उदयकाळात बनारस, राजगृह, अयोध्या, कौशाबी, चंपा, मल्ल, वैशाली, श्रावस्ती, उज्जैन, भारहुत, सांची, अमरावती, मथुरा, कपिलवस्तू व कुशीनगर इ.अनेक नगरे बहलेली होती.या विषयीचे उल्लेख तत्कालीन पाली संस्कृत व ब्राम्ही वाड:मयात आढळतात.या काळात अनेक राज्ये, घराणी व राजधान्या उदयास आल्या.राजधान्यांच्या ठिकाणी राजवाडे व इतर बांधकामे करणे आवश्यक ठरले.भूप्रदेश जिकणे, राज्याचा विस्तार करणे.इतर भागावर वर्चस्व मिळविणे.यामधून नागरीकरणचा विकास होत गेला. व हे नागरीकरण दोन टप्यामध्ये झाले. उत्तर भारतातील नागरीकरण व दक्षिण भारतातील नागरीकरण होय.

उत्तर भारतातील नागरीकरण:

याचा महत्वपूर्ण घटक म्हणजे लोखंडी नांगराचा अथवा लोखंडी वस्तूचा शेतीसाठी केलेला प्रयोग हा महत्वाचा भाग आहे. लोखंडी वस्तूचा वापर या कालखंडातील लोकांनी सुविधाजनक केला. लोखंडी वस्तूच्या वापराने शेतीच्या विस्तारास सुगमता आली. शेतकरी आपल्या आवश्यकतेनुसार अन्नधान्य निर्माण करू लागला.या शेतीतील अतिरिक्त उत्पादनाच्या आधारावर तत्कालीन समाजात विविध व्यवसाय करणारे वर्ग उदयास आले. यामध्ये कांही जण दुसऱ्याची सेवा करून आपले व कुंटूबांचे पालन पोषण करू लागले. धोबी, विणकाम करणारे, शिवणकाम करणारे, केसकापणारे, चामडी काम करणारे, हंस्तिदंती वस्तू कामकाज करणारे, लाकडी काम करणारे, वस्त्रे, माळा व इतर काम करणारे वर्ग उदयास आले. याचा उल्लेख जातक कथामध्ये आलेला आहे. हे व्यवसायिक ज्या ठिकाणी स्थिर झाले. त्या ठिकाणी मोठी गांवे व नगराचा उदय झाला.

शिल्पकला आणि उदयोंगधंदे यांचे स्थाईकरण झाले. हे उदयोंग नगरामध्ये परिवर्तित झाले. व्यवसायिक संघटनांचा उदय सुध्दा उत्पादन आणि वितरण प्रक्रियेमध्ये महत्वाचा राहिला. इ.स.पूर्व ६व्या शतकापासून व्यवसाय व उदयोंगाचा परराष्ट्रामध्ये प्रसार झाला. जातककथा मध्ये सार्थवाहो यांचा उल्लेख येतो. हा व्यापारी होता. तो ५०० गाडया तयार माल घेवून विविध ठिकाणी जावून माल विकत होता.अंतर्गत व्यापार हा स्थल मार्ग, जलमार्ग तर परकिय व्यापार हा समुद्र मार्गाने होत असे. श्रीलंका, ब्रम्हदेश, बॅबीलोन, दक्षिणपूर्व आशियाई देशांबराबर मोठा व्यापार होत असल्याचे दाखले मिळतात. यामुळे नागरीकीकरण व नगराच्या विकासाला

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

मोठी गती मिळाली.तसेच चलण निर्मितीलाही गती मिळाली. मुद्रा अर्थव्यवस्थेचा आंरभ याच काळात झाला.हिशेब, खतावणी नोंदी सुरू झाल्या.व्यापारी श्रेणीनी यामध्ये मोठी प्रगती केली. महाजन, दिवाणजी यासारखी पदे निर्माण झाली. नगरांच्या विकासाने सामाजिक संरचनेस प्रभाव वाढू लागला.ग्रामीण भागापेक्षा नगर,शहरातील वातावरण अधिक उन्मुक्त आणि वर्णव्यवस्था रहित होते.म्हणूनच प्राचीन नगराचे उत्थान अथवा विकास तीव्र गतीने झाला. पाणिनीचे अष्टाध्याय, मेगॅस्थेनिसचा इंडिका, कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथावरून आपणास कळते की राजधानी नगरे, औघोगिक नगरे, कृषीप्रधान नगरे, व्यवसायनगरे, नदीकाठावरील नगरे, शैक्षणिक नगरे संगमावरील नगरे अशी वर्गीत झाली.याचा प्रसार दक्षिण भारतात झाला.

दक्षिण भारतातील नागरीकरण:

दक्षिण भारतातील नागरीकरण हे संथगतीने झाले.ही प्रक्रिया इ.स.पूर्व ५व्या शतकापासून सुरू झाली. दक्षिणेकडील नागरीकरणवर द्रविडीयन संस्कृतीची छाप होती. आजच्या कर्नाटक, आंन्ध्र, केरळचा प्रदेश या नागरीकीकरणाच्या प्रक्रियातून गेला. तमिळ भाषेतील संगम साहित्यामध्ये दक्षिण भारतातील नागरीकरणाचा उल्लेख येतो.पुहाद, युरेयार, मदुराई, कांचीपुरम्, वांझी या नगराची माहीती मिळते. चेर, चोल व पांडय यांच्या राजधान्या व नागरीकरण प्रक्रिया यांची माहीती इंडिका व अर्थशास्त्र या ग्रंथात मिळते. ब्राम्हण— परपनीस, उमराव — अरसर, शेतकरी—वेलाल, व्यापारी —वनियार्स, आदिवासी—नकरर अशी समाजरचना दक्षिणेकडील प्रदेशात होती. अरब, ग्रीक, रोमन यांच्याबरोबर व्यापार भरभराटीस आल्याने नगरे सुध्दा विकसित झाली.मदुराई व कांचीपुरम् ही नगरे प्रसिध्द पावली. बंदराचा विकास झाला. कला,साहित्य,या क्षेत्रात दक्षिण भारतातील समाजाने अग्रस्थान मिळविले.

सारांश:

वरील संशोधन व माहीतीच्या आधारे आपण असा निष्कर्ष काढू शकतो की नगराचा विकास तत्कालीन समाजामध्ये नागरीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक, आर्थीक, राजनितीक, व्यवसायिक सर्व बाबीचा संयुक्त रूपाने विकास झाला.प्रा. आर.सी.शर्मा या सारख्या इतिहासकांरानी नागरीकरणाची प्रक्रिया ही केवळ आर्थीक कारणांमुळे घडून आली व त्यामुळे नगराचा विकास झाला असे म्हंटले आहे.पंरूतु नागरीकरणास अनेक प्रक्रियांनी हातभार लावला आहे असे संशोधनाअंती स्पष्ट होते.नागरीकरणातील सर्व नगरे ही दृड ग्रामीण अर्थव्यवस्था आणि अधिक उत्पादनाच्या आधारावर विकसित झाली आहेत. नगरातील लोकजीवण स्वायत होवून उदयोंग व्यापार बहरला सभ्यता, सत्यता व कष्ट याचा विकास झाला. ही नगरे विविधप्रकारची प्रमूख केंद्रे बनली. बनारस, राजगृह, अयोध्या, कौशांबी, चंपा, मल्ल, वैशाली, श्रावस्ती, उज्जैन, भारहुत, सांची, अमरावती, मथुरा,

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-6 | July – August 2026

कपिलवस्तू व कुशीनगर, पुहाद, युरेयार, मदुराई, कांचीपुरम्, वांझी ही नगरे प्राचीन भारताच्या दुसऱ्या नागरीकरणाची केंद्रे बनली. पुढील काळात या नागरीकरण प्रक्रियेचा कुशाण काळात सर्वोच्च बिंदू गाठला गेला.

संदर्भ सूची:

१. एडमस: द नेचुरल हिस्ट्री ऑफ अर्बनिज्म एन्शेंन्ट सीटीज् ऑफ द इन्डस.
२. एन्शेंन्ट इंडिया,ए न इन्ट्रोडक्टरी आउटलाइन.
३. चाइल्ड गार्डन:अर्बन रिवोल्यूशन, एन्शेन्ट सिटीज ऑफ द इन्डस.
४. झा.डी.एन:ए शेन्ट इंडिया: एन इन्ट्रोडक्टरी आउटलाइन.१९७७
५. शर्मा.आर.एस्. भारत के प्राचीन नगरों का पतन.
६. मोतीचंद्र: सार्थवाह १९५३.
७. थापर रोमिला: एन्शेंन्ट इंडियन सोशल हिस्ट्री.
८. शर्मा.आर.एस्: आयरन ॲन्ड् अर्बनाइजेशन इन द गंगा बेसिन.१९९५
९. शर्मा.आर.एस्:इंडियाज् एन्शेंन्ट पास्ट. ऑक्सफर्ट युनिव्हरसिटी प्रेस.२००५.
१०. ढवळीकर मधुकर केशव: भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन प्रा.लि. पुणे मार्च २०१७.
११. पाटील,थोरात,डॉ.पवार:प्राचीन भारत,आरंभ ते इ.स.१२००, फडके प्रकाशन,कोल्हापूर.२०२०